दि.१७/११/२०२२

# मराठी भाषेची परंपरा वैभवशाली–अजय शहा



मालेगाव:–मराठी भाषा पंधराशे ते दोन हजार वर्षापासून चालत आलेली असून तिच्या लवचिकतेमुळे आणि सर्वसमावेशकतेमुळे तिने एवढा मोठा प्रवास केला असल्याचे प्रतिपादन येथील सामाजिक कार्यकर्ते आणि काकाणी नगर वाचनालयाचे अध्यक्ष मा.श्री. अजय शहा यांनी केले. महाराजा गायकवाड महाविद्यालय मराठी विभाग आणि मालेगाव मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या भाषेच्या प्रचार – प्रसार मोहिमेअंतर्गत कार्यक्रमात समृद्ध व शाश्वत मराठी भाषा या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखाप्रमुख डॉ. एन. बी. बच्छाव हे होते. मराठी भाषेचा काल–आज आणि उद्या सांगताना अजय शहा यांनी विविध उदाहरणे तसेच अनेक

साहित्य संघाचे अध्यक्ष श्री.रमेश उचित, मराठी विभाग प्रमुख डॉ.ए.जी. नेरकर, कवी रविराज सोनार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष मनोगतात डॉ.एन.बी.बच्छाव यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण प्रयत्नशील होऊया असे आव्हान विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जी. जे. भामरे यांनी, पाहुण्यांचा परिचय मराठी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.ए.यु.पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. स्नेहल मराठे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. विनोद गोरवाडकर, डॉ. सपना सोनवणे, डॉ. संतोष कन्नोर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शहरातील मराठी साहित्य संघाचे अनेक मान्यवर, डॉ. राज त्रिभुवन डॉ. बी.एम.


on OnePlus
d by Dual Camera
Scanned with
CamScanner


Scanned with
CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner